## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. १२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०३/२०१८

**१) संगनमत करुन भांडण करुन शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने विवाहीतेने विहीरीचे पाण्यात उडी घेवुन मरण पावल्याने गुन्हा नोंद . :-**

दिंनाक ०५/०३/२०१८ चे २०.३० ते ०६/०३/२०१८ ०३.३० वाजता. दरम्यान यातील मृतक हीचे लग्न झाले पासुन मुल -बाळ होत नसल्याने यातील आरोपीतांनी संगनमत करुन मृतक सोबत नेहमी भांडण करुन मानसिक व शारिरीक त्रास देवुन त्रासाला कंटाळुन मृतकने विहीरीचे पाण्यात उडी घेवुन मरण पावली व मृतक हिला आत्महत्येस प्रवृत्त करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व मर्ग क्र. ०८/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०६,४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन फुस लावुन मुलाला अपकृत केल्याने गुन्हा नोंद :-**

दिंनाक ०५/०३/२०१८चे २०.३० वा ते ०६/०३/२०१८ चे ०८.३० यातील आरोपीतांनी घरी येवुन अनाधीकृतपणे प्रवेश करुन फिर्यादीचा मुलगा यास २०,०००/-रु. व्याजाने मागीतलेले पैसे परत दे, म्हणुन मागणी करुन हाताबुक्यांनी मारहान करुन तु उदया दहावीच्या पेपरला कसा जातोस? असे म्हणुन पाहुन घेवु अशी धमकी देवुन फिर्यादीचे मुलास आरोपीतांनी संगनमत करुन फुस लावुन अपकृत केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४४८,३६३,३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) बचत खात्यावरुन ऑनलाईन शापींग करुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिंनाक ०३/०५/२०१८ चे १७.१५ वाजता. ते दिनांक ०५/०३/२०१८ चे ०९.३० वाजाता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे मोबाईवर फोन करुन स्टेट बॅक ऑफ इंडिया भंडारा शाखेचा मॅनेजर बोलत असल्याची व फिर्यादीचे एटीएम बंद झाल्याची खोटी माहिती देवुन त्यांना एटीएम सुरु करण्यासाठी व आधार कार्ड लिंक करण्यासाठी फिर्यादीचे मोबाईवर आलेले ओटीपी नंबरचे मॅसेज विचारुन त्यांचे बचत खात्यावरुन एकुण ८४,९९६/-रु. ची ऑनलाईन शापींग करुन फिर्यादीची आनलाईन फसवणुक केल्याने फिर्यादी जयंतकुमार सुरेशकुमारचंद्र जैन वय ६६ वर्ष, रा. टवेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवि. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. चकाटे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . -**

दिंनाक ०३/०३/२०१८ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीने अल्पवयीन फिर्यादी हीचा पाठलाग करुन तु मेरे साथ शाही नही करती और मुझसे प्यार नही करती मै तुझसे ईतना प्यार करता हु देख मै तुझे रस्टीकेट करवाता हु असे अल्पवयीन फिर्यादीस धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३५४(ड), ५०६ भादवी. सहकलम १२ पोक्सो अॅक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

५) बासाच्या काठीने मारुन दुखापत करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . –

दिंनाक ०६/०३/२०१८ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीला फिर्यादीने तुम्ही माझ्या सोबत चांगले का वागत नाही तुमचा बाहेर लफडा आहे, असे हटकले असता आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन बासाच्या काठीने हातावर व कमरेला मारपीट करुन दुखापत केली व पुन्हा जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. संगीता गुरुदेव ईडपाते वय ३२ वर्ष, रा. लंजेरा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

६) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन ओंढतान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . –

दिंनाक ०६/०३/२०१८ चे ११.३० वाजाता. दरम्यान यातील फिर्यादी हा म.रा.वि.वि. कंपनी आसगाव येथे कनिष्ठ तंत्रज्ञ या पदावर नियुक्तीस असुन आरोपी याने विज बिलाचा भरणा न केल्याने फिर्यादी याने पोल वरुन लाईट बंद केले असता यातील आरोपी याने फिर्यादीस तु माझी लाईट कशी कट केली, असे बोलुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला व भांडण करुन धक्का बुक्की केली व हात ओढंतान केला व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३३२,१८६,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

७ विहीरीचे पाण्यात बुडुन महिलेचा मृत्यु . :–

दिंनाक ०५/०३/२०१८ चे २१.३० ते दिनांक ०६/०३/२०१८ चे ०३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रमोद प्रितीलाल ठाकरे वय ३० वर्ष, रा. हनुमान वार्ड डोंगरला हा व त्याची पत्नी व आई हे घरात वेगवेगळया पलंगावर झोपले असतांना फिर्यादीची आई रात्री ०२.३० वाजता दरम्यान लघुशंके करीता उठुन फिर्यादीचे घरातील लाईट चालु केले असता फिर्यादीची पत्नी मृतक सौ. गौरी प्रमोद ठाकरे वय २६ वर्ष, रा. हनुमान वार्ड डोंगरला ही पलंगावर दिसुन आली नाही फिर्यादीचे आईने ईकडेतिकडे पाहुन न दिसल्याने मुलाला सांगीतले की तुझी पत्नी गौरी ही पलंगावर झोपलेली दिसत नाही, नंतर तिचा शोध घेतला असतांनी गावाजवळील शेतात नौकर व पुतन्याला शोध घेण्याकरीता सोबत पाठविले दोघांनी विहीरीत पाहणी केली असता मृतक गौरी ही विहीरीत मरण पावलेली दिसली फिर्यादीला फोनवर माहिती दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. मेसरे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०६/०३/२०१८ चे १७.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी करचखेडा फाटा येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. मते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मते पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**९) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०६/०३/२०१८ चे १९.५० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही राजीव गांधी चौक भंडारा येथे चालवितांनी मिळुन आल्याने, त्यास ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिनद्वारे श्वासाचा नमुना घेतला असता त्यात अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. आळे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०६/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, सिहोरा व लाखांदुर येथे अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८३० किलो सडवा मोहापाला + मडके ५ किंमती २६,४००/–रु. देशी दारु १ लिटर ९८० मिली लिअर देशी दारु किंमती ५७२/–रु. असा एकुण २६९७२ /रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०६/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०७ तीन सिटर वाहनाकरीता ६ ईतर वाहनांवरती – ११५ केसेस करण्यात आले आहे.

07.3.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.